# बॅ. रामराव देशमुख यांच्या राजकीय विचार व कार्याचे मुल्यमापन

**प्रा. अमोल भाऊरावजी बंड** सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.

---

सारांश :

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये महाराष्ट्रातील विदर्भ हा प्रांत वऱ्हाड म्हणून ओळखल्या जात होता व हा प्रांत 1904 मध्ये कारभाराच्या सोईकरीता नागपूर प्रांताला जोडल्यानंतर या प्रांताला मध्यप्रांत वऱ्हाड असे नाव प्राप्त झाले विदर्भाला महान नेत्यांची परंपरा प्राप्त झालेली आहे. त्यामधीलच एक सुबुध्द, प्रतिभावन व सुस्कृत नेतृत्व म्हणजे बॅ. रामराव माधवराव देशमुख. बॅ. रामराव माधवराव देशमुख यांनी विलायतेतून शिक्षण पूर्ण करुण आल्यानंतर त्यांनी स्वत:ला राष्ट्रीय आंदोलनामध्ये सहभागी करुन घेतले. वऱ्हाडप्रांतावर लोकमान्य टिळकांचा प्रभाव असल्यामुळे बॅ. रामराव देशमुख हे सुध्दा टिळकांच्या विचारामुळे प्रभावित झाले. टिळकांच्या होमरुल चळवळीमध्ये सहभागी होऊन त्यांनी आपले कार्य सुरु केले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विभिन्न पदांवर कार्य करीत असतांना साधनसुचिता, निस्वार्थपणा, क्रियाशीलता, राष्ट्रसेवा या गोष्टींना त्यांनी प्राथमिक महत्तव दिले. राजकारण, शिक्षण व सहकार या क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कार्याची अमिट छाप पाडलेली आहे. त्यांनी सत्तेला स्वराज्य प्राप्तीचे साधन मानले. त्यांनी आपल्या जिवनामध्ये कित्येक पदे उपभोगली व चुटकीसरशी त्यागली सुध्दा मध्यप्रांत सरकारने शेतकऱ्यांच्या कापसावर विक्रीकर लादताच त्यांनी सत्तात्यागाची तयारी दर्शविली. बॅ. रामराव देशमुख यांनी विविध शासकीय पदावर कार्य करीत असतांना समाजहित कसे साधता येईल याचाच सदैव विचार केला. त्यांनी केवळ स्वत:चा विचार न करता संपूर्ण आयुष्य राष्ट्रउभारणी व समाजउभारणीकरीता खर्ची घातले. बॅ. रामराव देशमुख यांनी राजकारणामध्ये सक्रीय झाल्यानंतर भूषविलेली पदे ही थक्क करणारी आहेत. परंतु ते कितीही मोठ्या पदावर कार्य करीत असतांना त्यांचा विचारांचा जो केंद्रबिंदु होता तो सामान्य मानुस, शेतकरी हाच होता. त्यामुळे बॅ. रामराव देशमुख यांचे राजकीय विचार व कार्य हे वर्तमान व भावी पीढीला आदर्श स्वरुपाचे आहेत.

**प्रस्तावना :**

बॅ. रामराव देशमुख यांचा जन्म हा 25 नोव्हेंबर 1892 रोजी दर्यापूर तालुक्यातील पिंपळोद या एका लहान खेडेगावामध्ये आजोबाकडे झाला. त्यामुळे 1892 ते 1907 पर्यंत ग्रामीन भागाचा प्रभाव त्यांच्यावर होता. नंतर हायस्कूलचे शिक्षण अमरावतीला व उच्च शिक्षणाकरीता ते इंग्लंडला गेले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते भारतात परत आले. त्यावेळी बॅ. रामराव हे काही कमी नव्हते. घरी आर्थिक उदंडता होती, रुप व व्यक्तीमत्व होते. परदेशातुन उच्च पदव्या प्राप्त करुन आणल्या होत्या. तसेच नवीन काळातील नविन दृष्टी त्यांच्याकडे होती. ह्या सर्व गोष्टी उपभोगुन त्यांचे आयुष्य आनंदात गेले असते. परंतु बॅ. रामराव देशमुख यांना समाजाबरोबरच देशाच्या दु:स्थितीची जाणीव होती. त्यामुळे संपूर्ण वैभव नाकारुण त्यांनी सामाजिक कार्याच्या प्रेरणेने सार्वजनिक क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी भारतामध्ये लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट यांनी होमरुल चळवळ सुरु केली होती. बॅ. रामराव देशमुख हे होमरुल चळवळीशी जोडल्या गेले. बॅ. रामराव देशमुख यांच्या जीवनाला खरी कलाटणी जी मिळाली ती म्हणजे अखिल भारतीय मराठी परिषद बेळगांव 1917. अखिल भारतीय मराठी परिषदेचे अध्यक्ष म्हणुन त्यांची निवड झाली व या अध्यक्ष पदावरुन केलेल्या भाषणाने त्यांना संपूर्ण भारतभर प्रसिध्दी प्राप्त झाली. सुमारे एक तास केलेल्या अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांचा मुख्य विषय जो होता तो म्हणजे आपल्याला देश घडवायचा असेल तर जाती आधारित प्रतिनिधीत्वाची मागणी बंद करुन राष्ट्रीयत्वाकडे वळावे लागेल. जातीवादी प्रतिनिधीत्व हे राष्ट्राच्या विकासाला घातक आहे. त्यामुळे देशाची एकता आणि अखंडता संपूष्टात येईल. राष्ट्रवादाकडे सर्वांनी वळावे. या घटनेमुळे बॅ. रामराव देशमुख यांच्या नेतृत्वाला मान्यता प्राप्त झाली. बॅ. रामराव देशमुखांना यांनतर कित्येक महत्त्वाची पदे प्राप्त झाली तसेच त्यांच्या नेतृत्वावर लोकमान्य टिळकांचा प्रभाव होता. त्यामुळेच ते टिळकांचे अनुयायी बनले. परंतु लोकमान्य टिळकांच्या नंतर ते गांधीजीकडे झुकले असतांना सुध्दा टिळकांची लढाऊवृत्ती, कणखरपणा व झुंजारपणा त्यांनी सोडला नाही.

**बॅ. रामराव देशमुख यांचे राजकीय विचार व कार्य :**

बॅ. रामराव देशमुख हे विलायतेवरुन आपले शिक्षण पूर्ण करुन आल्यानंतर भारतीय समाजाची दयनीय स्थिती पाहून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रकार्यासाठी खर्ची घालण्याची घोषणा केली व त्यानुसार टिळक व ॲनी बेझंट यांच्या होमरुल चळवळीमध्ये सहभागी झाले. भारतीय समाजामध्ये जनजागृती, राष्ट्रवादी भावना व नवचैतन्य निर्माण करण्यासाठी

त्यांनी प्रयत्न केले. त्याचवेळी इंग्रजी सत्तेविरुध्द वाढत जाणारा लोकशोभ कमी करण्यासाठी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी 20 ऑगस्ट 1919 रोजी मॉण्टेग्यु चेम्सफोर्ड योजना समोर केली. त्यानुसार मध्यप्रदेश शासनाची सुत्रे चीफ कमिशनरकडून घेऊन या प्रांताकरिता गर्व्हनर जनरलची नियुक्ती करण्यात आली व व्दिदल शासन पध्दतीची सुरुवात झाली. व्दिदल शासन प्रणालीनुसार मध्यप्रांत विधानसभेची सदस्य संख्या ही 27 वरुन 70 करण्यात आली. प्रांतीय सरकारमधील खात्यामध्ये राखीव खाते व सोपीव खाते असे विभाजन करण्यात आले. राखीव खात्याचा कारभार गर्व्हनर जनरलने त्याच्या कार्यकारणीतील एक युरोपीयन व एक हिंदी सभासद यांच्या साह्याने पार पाडावा व सोपीव खात्याचा कारभार लोकांमधुन निवडून दिलेल्या एक किंवा एकापेक्षा अधिक नेमलेल्या मंत्र्यांनी पार पाडावा अशी व्दिदल पध्दती तयार करण्यात आली. या योजनेनुसार मध्यप्रांत वऱ्हाडची पहिली निवडणूक ही 1920 मध्ये घेण्यात आली व त्याचवेळेस महात्मा गांधींनी कलकत्ता अधिवेशनामध्ये असहकार चळवळीचा ठराव पास करुण संपूर्ण भारतामध्ये असहकार चळवळीची घोषणा केली. काँग्रेसमधील राष्ट्रीय पक्ष्याच्या गांधीजींच्या असहकार चळवळीला समर्थन होते. परंतु त्यातील कायदे-कौन्सिलावर बहिष्काराला विरोध होता. तरीसुध्दा महात्मा गांधीच्या या आंदोलनामुळे 1920 च्या मध्यप्रांत वऱ्हाडच्या बऱ्याच उमेदवारांनी आपली उमेदवारी माघे घेतली. परंतु याला अपवाद ठरले बॅ. रामराव देशमुख हे 1920, 1923, 1926 व 1937 मध्ये मध्य प्रांत लेजिस्लेटिव्ह कॉन्सिलचे सदस्य म्हणुन निवडुण आले. तसेच त्यांनी मंत्री म्हणुन सुध्दा कामकाज केले. बॅ. रामराव देशमुख मध्यप्रांत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सदस्य असतांना ते एका घटनेमुळे फार प्रसिध्द झाले होते. ती घटना अशी जेव्हा लॉर्ड रिडींग याने राजपुत्र वेल्स याला भारत भेटीकरीता आमंत्रित केले होते. तेव्हा विधिमंडळामध्ये बॅ. रामराव देशमुख यांनी युवराजांच्या स्वागत ठरावला कसुन विरोध केला. त्याचप्रमाणे मध्यप्रांत वऱ्हाड या प्रदेशाचे स्वरुप हे हिंदी-मराठी संयुक्त स्वरुपाचे होते. हिंदी भाषिक वर्चस्वामुळे मंत्रिमंडामध्ये सुध्दा वारंवार खटके उडत असत. महसुल वाटणीमध्ये सुध्दा भेदभाव होत होता. त्याकरिता 1922 मध्ये सीम या इंग्रज अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सीम नावाची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार 60 मध्यप्रांत व 40 वऱ्हाड असे 60:40 महसूल खर्चाचे प्रमाण ठरविण्यात आले परंतु या धोरणाची अंमलबजावणी कधील झाली नाही. बॅ. रामराव देशमुख मंत्री असतांना त्यांनी जाणीवपूर्वक वऱ्हाड प्रांताकरीता 37 टक्क्यापर्यंत हा महसुल खर्च नेण्याचा प्रयत्न केला.

बॅ. रामराव देशमुख यांनी आपली जीवनभर (आयुष्यभर) कार्य करीत असतांना विदर्भाच्या शेतकऱ्यांचा त्यांना अजिबात विसर पडला नाही. कृषीक्षेत्र हा भारताचा प्राण आहे व औद्योगिकदृष्टया मागासलेल्या वऱ्हाडचा तो पंचप्राण आहे. या गोष्टीची जाणीव बॅ. रामराव देशमुख यांना पुर्वीपासूनच होती. त्यामुळे मध्यप्रांत सरकारने कापसावर विक्रीकर लादताच ते पेटून उठले व विक्रीकराच्या अन्यायाविरुध्द, सरकारविरुध्द भूमिका घेतली. सर्व वऱ्हाड पेटून उठला. ठिकठिकाणी सभा, संमेलने, मोर्चे काढण्यात आले. शेवटी सरकारला आपल्या निर्णयामध्ये बदल करणे भाग पडले. अशाप्रकारे बॅ. रामराव देशमुख यांनी समाजकार्याकरीता स्वत:ला वाहून घेतले.

**बॅ. रामराव देशमुख यांचे महाराष्ट्र प्रांतीक परिषदेतील विचार :**

बॅ. रामराव देशमुख 1925 मध्ये महाराष्ट्र प्रांतिक परिषद सातारा येथील अध्यक्षपद भूषवून आपले राजकीय विचार व्यक्त केले. त्यापुर्वी 1924 काँग्रेसचे अधिवेशन हे बेळगांव येथे आयोजित केले होते व त्यामध्ये काही विचित्र ठराव पास केले होते. हे अधिवेशन महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. त्यामुळे अशा विचित्र अटी रद्द करण्यासाठी ही परिषद बोलाविण्यात आली होती. बॅ. रामराव देशमुख यांनी आपल्या विचारामध्ये 'सुतास मत' या तत्त्वामुळे काँग्रेस पक्षाचे लोकमतदर्शक स्वरुप नष्ट होवून ती एक कंठप्राण असलेली संस्था झालेली आहे. तसेच त्यांनी भाषावार प्रांत रचना, निरुपयोगी सिव्हील सर्व्हीसेसचे तत्व, जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी अस्पृश्यता निवारण, बहिष्कार, स्वदेशी तसेच महात्मा गांधीजींनी जे स्वदेशीचे संकुचित स्वरुप चरका म्हणजे स्वदेशी असे जे विचार स्पष्ट केले त्याचा समाचार घेत त्याविरुध्द आपले विचार व्यक्त केले.

**बॅ. रामराव देशमुख यांनी काँग्रेस अंतर्गतच विभिन्न पक्षामध्ये केलेले कार्य :**

बॅ. रामराव देशमुख यांनी काँग्रेस अंतर्गतच विभिन्न राजकीय पक्षामध्ये कार्य केले. स्वराज्य पक्ष, प्रतिसहकार पक्ष व लोकशाही स्वराज्य पक्षाच्या माध्यमातुन आपली भूमिका मांडली. 1930 मध्ये प्रतिसहकार पक्ष विसर्जित झाल्यानंतर ऑक्टोंबर 1933 मध्ये लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना करण्यात आली. पक्षाचे अध्यक्ष न.चि. केळकर व बॅ. रामराव देशमुख यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली व बॅ. रामराव देशमुख यांनी काँग्रेस अंतर्गतच आपली भूमिका प्रामाणिकपणे मांडली.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध संस्थानांनमध्ये बॅ. रामराव देशमुख यांची नियुक्ती :**

भारतातील स्वातंत्र्यपूर्व काळात वेगवेगळया संस्थानिकांच्या राजवटी होत्या व या संस्थानिकांना आपल्या संस्थानच्या यशस्वी व्यवस्थापनाकरीता व इंग्रज सरकारशी व्यवहार करण्याकरिता व्यवहाचतुर व अष्टपैलु व्यक्तीची आवश्यकता भासत होती. त्यामुळे बॅ. रामराव देशमुख यांची सोंडूर संस्थांमध्ये राज्यकारभार पाहण्याकरीता प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर 1938-41 या कालखंडात त्यांची सेंट्रल इंडिया अँड अदर स्टेटस ऑर्गनायजेशन जनरल सेक्रेटरी व कायदयाचे सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर 1941 ते 1944 या कालावधीत बॅ. रामराव देशमुख यांची ग्वाल्हेर संस्थानमध्ये अर्थमंत्री म्हणुन नियुक्ती करुन त्यांनी संस्थानला खुप मोठ्या प्रमाणात लाभकारी निर्णय घेण्यास मदत केली. त्यानंतर 1947-48 मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांना तार करुन दिल्लीला बोलविले आणि रेवा संस्थानच्या दिवानपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. रेवा संस्थानचा राजा गुलाबसिंग याला गादीवरुन हटवून तेथे मार्तंडसिंग याला गादीवर बसविण्यात आले होते व गुलाबसिंग याला रेवा संस्थानमध्ये येण्यास बंदी घालण्यात आली होती. तरीसुध्दा गुलाबसिंग रेव्याला येऊन दाखल झाला. राजाचे दर्शन घेण्याकरीता हजारो लोक जमा झाले. पैशाच्या प्रलोभनामुळे सुध्दा दरबारातील अनेक लोकांना आस्था होती. परंतु बॅ. रामराव देशमुख यांनी भारत सरकारच्या आदेशानुसार व्यवहारचातुर्याने त्याला संस्थानच्या बाहेर काढले.

**बॅ. रामराव देशमुख यांचे राज्यसभेतील कार्य :**

बॅ. रामराव देशमुख यांचे लोकसभेच्या निवडणुकीचे तिकीट चुकीच्या कारणामुळे काँग्रेस कार्यकारी समितीने कापले व याचा धक्का काँग्रेसमधील बऱ्याच मोठ्या नेत्यांना बसला. त्यानंतर ब्रिजलाल बीयांनी यांनी बॅ. रामराव देशमुखांना अशी विनंती केली मी राज्यसभेकरीता तुमच्या नावाची शिफारस करतो. परंतु बॅ. रामराव देशमुख यांनी स्पष्ट नकार दिला व नंतर दिल्लीमध्ये सी. डी. देशमुख व आर. के. पाटील यांनी ठरविले की ही पक्षाची खूप मोठी चुक झाली व ती दुरुस्त करायची असेल तर बॅ. रामराव देशमुख यांना राज्यसभेकरीता संधी दयावीच लागेल. त्यामुळे आर. के. पाटील यांच्या विनंतीवरुन बॅ. रामराव देशमुख हे राज्यसभेचे सदस्य म्हणुन दोनदा त्यांची (1952 ते 1964) राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आली. बॅ. रामराव देशमुख यांनी राज्यसभेमध्ये रेल्वे बजेटसंदर्भात बऱ्याचदा सभागृहामध्ये भाग घेतला व 1954 मध्ये राष्ट्रपतीच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्ताव सुध्दा मांडला तसेच राज्यसभेमध्ये विभिन्न मुद्दयावर जसे की वेगवेगळया ठिकाणी ओव्हरहेड ब्रिज बांधणे, रेल्वे कर्मचाऱ्यांनी जनसुविधेला बाधा होऊ नये याकरिता रेल्वे संपाचा वापर करु नये अशा विविध मुद्यांवर सुचना केल्या.

**निष्कर्ष :**

बॅ. रामराव देशमुख तथा अण्णासाहेब देशमुख बुध्दिने, मनाने, ज्ञानाने आणि श्रध्देने मोठ्यांत मोठे पुढारी असले तरी प्रांतातील सर्वसाधारण जनतेला आणि कार्यकर्त्याला ते अगदी आपल्यापैकी एक वाटावेत असेच त्यांचे वागणे बोलणे असायचे. अधिकाराचा मद नाही. अहंकाराचा लवलेश नाही. पण प्रत्येक गोष्ट विचाराच्या कसोटीवर तपासण्याची वृत्ती दुध ते दुध व पाणी ते पाणीच हे स्पष्टपणे कुणाचाही मुलाहीजा न करता स्पष्टपणे सांगण्याची परखड प्रवृत्ती त्यांची होती. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये विविध पदे भूषविणारे बॅ. रामराव देशमुख यांनी सत्तेला स्वराज्यप्राप्तीचे साधन मानले. साधनसुचिता हे त्यांचे जीवनव्रत होते. त्यांनी आयुष्यभर एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे निष्कलंक राहून देशसेवा केली. त्याचप्रमाणे ते आपले संपूर्ण जीवन आपल्या स्वत:च्या अटीवर जगले. कुठल्याही पदाचा त्यांनी जिवनामध्ये मोह बाळगला नाही. तसेच स्वत:करीता काही मिळावे याकरिता कुणाकडे कधीही विनवण्या सुध्दा केल्या नाहीत. तसेच सत्ता हे स्वराज्य निर्मितीचे साधन आहे. साध्य नव्हे म्हणुनच बॅ. रामराव देशमुखांनी पदे स्विकारली व चुटकीसरशी त्यागलीही प्रगाड बुध्दीमत्ता, विलक्षण आत्मविश्वास या बळावर स्वातंत्र्यानंतर सत्तेच्या कळपात त्यांना राहता आले असते. पण जीवनमुल्याशी तडजोड हे त्यांना उभ्या आयुष्यात मान्यच नव्हती. अशाप्रकारच्या त्यांच्या समाजाकरिता केलेल्या (दिलेल्या) भरीव योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना 1971 मध्ये पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गुणगौरव केला व त्यामुळेच अमरावतीमध्ये महाराष्ट्राचे राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या हस्ते बॅ. रामराव देशमुख यांच्या सत्कारप्रसंगी ब्रिजलाल बियानी यांनी खालील उद्गार काढले. “1916 चा काळ हा फार निराळा होता. त्याकाळात बॅ. रामरावांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ झाला. बहुजन समाजात सार्वजनिक जीवनाचा सुर्वोदय खऱ्या अर्थाने त्यांनीच केला. तेव्हाच्या काळातील असे एकही सार्वजनिक कार्य नाही की जे बॅ. रामरावजी आणि लोकनायक अणेंच्या प्रयत्नाने झालेले नाही. बॅ. रामरावजी हे आपल्या विचारांचे फार पक्के आहेत. त्यांचे जीवन समन्वयवादी आहे. खऱ्या विदर्भाला त्यांनी गेली 40 वर्ष प्रेरणा दिल्या आहेत. त्यांचे व माझे अनेकवेळा मतभेद झाले, संघर्ष झाले पण त्यांच्या व माझ्या प्रेमात कधीच अंतर पडले नाही.

**संदर्भ :**

1. पद्मभुषण बॅ. रामराव उर्फ अन्नासाहेब देशमुख जन्मशताब्दी स्मरणिका
2. ओहळे दत्तात्रय शशिकांत, जननायक अमरावतीचे विवेकशील नेतृत्व अव्दैत प्रकाशन, न्यू स्वस्तिक नगर, बडनेरा रोड, अमरावती
3. श्रीमती हरदास वीणाबाई बाळशास्त्री, लोकनायक अणे व त्यांचा काळ – भाग – 1 ला पद्मविभूषण लोकनायक माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे यांचे चरित्र प्रकाशक लोकनायक अणे जन्मशताब्दी समिती.
4. महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष रामराव माधवराव उर्फ अन्नासाहेब देशमुख यांचे भाषण
5. कारंजकर भि. दे., अमरावती शहराचा इतिहास, अमरावती नगर पालीका शताब्दी ग्रंथ
6. डॉ. कोलारकर श.गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर
7. Sharma H., oral History Transcript of R.M. Deshmukh NMML, New Delhi.
8. डॉ. वैद्य सुमन व डॉ. कोठेकर शांता, महाराष्ट्रातील कॉंग्रेसचा स्वातंत्र्य लढा (1885 ते 1920) प्रथम आवृत्ती 1985 महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई.
9. फडके य. दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड दुसरा (1914 ते 1920) के. सागर पब्लीकेशन
10. जैन पुखराज, भारत का संवैधानिक विकास और राष्ट्रीय आंदोलन, सरस्वती सदन, जवाहन नगर, दिल्ली.